क्र. जि.का./नै.आ./कोविड-१९/कावि-६९५/२०२१
जिल्हाधिकारी, कार्यालय, नागपूर
दिनांक २४/०५/२०२१

# परीपत्रक

**विषय :- टॉसीलीझुमॅब(Tocilizumab) इंजेक्शनचा वाटपाबाबत.**

संदर्भ :- मा. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांचे पत्र क्र.कोविड/Tocilizumab **पुरवठा**/११५-२०२१/१३, दिनांक २८/०४/२०२१

आज दिनांक **२४/०५/२०२१** रोजी नागपूर जिल्हयासाठी प्राप्त झालेल्या **टॉसीलीझुमॅब(Tocilizumab)** इंजेक्शनचे रुग्णालय निहाय वाटप सोबतच्या यादीप्रमाणे करण्यात आलेली आहे. तरी संबंधित कोविड रुग्णालयांनी त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या संख्येप्रमाणे व औषध पुरवठादार नुसार त्यांचेकडून तात्काळ **टॉसीलीझुमॅब(Tocilizumab)** इंजेक्शन प्राप्त करुन घ्यावेत. कोणत्याही प्रकारची दिरंगाई,टाळाटाळ,कसूर होणार नाही याची दक्षता रुग्णालय प्रशासन व घाऊक विक्रेते यांनी घेणेचे आहे.

संबंधित कोवीड रुग्णालयांनी सदरचा औषध साठा प्राप्त करुन घेणेकामी रुग्णालयाच्या लेटर हेड वर सही शिक्यानिशी प्राधिकारपत्र (**रुग्णालयातील जबाबदार व्यक्ती किंवा रुग्णालयातील औषधालयाचे नावे**) व प्राधिकृत व्यक्तीचे फोटो ओळखपत्र घाऊक विक्रेत्याकडे सादर करणे आवश्यक आहे. याबाबतची खातरजमा करुन घाऊक विक्रेत्यांनी औषधाचे सुयोग्य वितरण सदर आदेशाचे दिनांकास मुदतीत व शासकीय/वाजवी दरात करणेचे आहे.

उपरोक्त औषध अल्पप्रमाणात उपलब्ध असल्याने संबंबधित रुग्णालयाने औषधाचा वापर योग्य रुग्णासाठी करण्याबाबत समितीची नेमणूक करावी. सदर समितीत Intensivist, Physician, Pulmonologist, यांचा समावेश असावा व सदर समितीने रुग्णाबाबत प्राथाम्यक्रम ठरवावा.

औषध व प्रशासन, नागपूर यांचे अधिकारी/कर्मचारी यांनी सदर वितरण तक्त्यानुसार वाटप होत असलेली व सदर वितरीत औषधांचा उचित विनियोग होत असल्याची वेळोवेळी खातरजमा करुन अनियमितता आढळलेस संबंधितांवर कारवाई करावी.

या कार्यालयाचे भरारी पथकांनी वाटप तक्त्यानुसार वाटप व विनियोगाबाबत खातरजमा करुन अनियमितता आढळलेस संबंधित रुग्णालय प्रशासन/घाऊक विक्रेते यांचेवर नियमानुसार कारवाई करुन अहवाल सादर करावा.

जिल्हाधिकारी, नागपूर करीता

## HOSPITALWISE ALLOTMENT OF TOCILIZUMZB ON 23-05-2021- NAGPUR DISTRICT
## ALLOTMENT AS PER DEMAND PLACED

| SR. NO | NAME OF HOSPITAL | URBAN/ RURAL | ALLOTED TOCILIZUMAB | | NAME OF DISTRIBUTOR FROM WHOM TO COLLECT |
|---|---|---|---|---|---|
| 1 | GAIKWAD CRITICAL CARE CENTRE | NAGPUR URBAN | 5 | 5 vials of 80 mg each | SHREEJI SALES CORPORATION (CIPLA) (9823410939) |
| 2 | MEDITRINA HOSPITAL | NAGPUR URBAN | 10 | 10 vials of 80 mg each | SHREEJI SALES CORPORATION (CIPLA) (9823410939) |
| 3 | HOPE HOSPITAL | NAGPUR URBAN | 5 | 5 vials of 80 mg each | SHREEJI SALES CORPORATION (CIPLA) (9823410939) |